विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संचालक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| प्रकाशक | : | सध्दर्म प्रकाशन |
| प्रकाशन वर्ष | : | १९८८ |
| वर्ष | : | बाविसावें |
| अंक | : | दुसरा |
| पृष्ठे | : | १६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७८**

Registered with the Registrar of News-pepers for India, under R.N. 20770/71

# सद्धर्म

त्रै मा सि क

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वर्ष तेविसावें
अंक दुसरा
ज्येष्ठ : १९१०
जुलै १९८८
वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान
पांच रुपये

## लक्षांत ठेवा....

देवानां प्रिय प्रियदर्शी राजाची इच्छा आहे कीं–त्याच्या साम्राज्यांत सर्व पंथांच्या लोकांनीं गुण्यागोविंदानें नांदावें, कारण कोठलाही पंथ झाला तरी तो, संयम आणि मनाची शुद्धता हवी, असेंच सांगतो.

निरनिराळ्या पथांचे लोक आपल्या हातून पुण्य घडावें या हेतूनें आपआपल्या कुवती-प्रमाणें हरतऱ्हेचीं लहान मोठीं कृत्यें करीत असतात. पण लक्षांत ठेवा कीं, हीं कृत्यें करीत असतां माणसाच्या ठायीं संयम नसेल, त्याचें मन शुद्ध नसेल, त्याच्यांत कृतज्ञता व श्रद्धा नसेल, तर त्याचीं सारीं कृत्यें–मग तीं कितीही मोठीं असलीं–तरी तीं कुचकामाचीं ठरतील.

२२०० वर्षांपूर्वीच्या "शहाबाजगढ" येथील अशोकाच्या शिलालेखाच्या आधारें...

पत्रव्यवहाराचा पत्ता :
ह. ज. हामले, संपादक 'सद्धर्म'
३२४, वि. प. रोड, मुंबई ४००००४

## या अंकांत....

१) जैसें खेत्रीं पेरिजे ... २
२) लोहपरिसाची न साहे उपमा ... ३
३) श्रीदक्षिणामूर्तिस्तोत्रम् ... ८
७) सेवेशीं श्रुत होय ... १२
४) नैवेद्य समर्पण ... १३
५) काकदृष्टी नसावी ... १५
६) हव्यास ... १६

## कृपया....

१. मनिऑर्डर श्रीधर भालचंद्र आणि कंपनी कापडाचे व्यापारी, प्रार्थना समाज मुंबई ४ या पत्यावरच पाठवावी. मनी ऑर्डरचे कूपनवर आपला पूर्णपत्ता व पूर्णनांव अगत्यानें लिहावें. ग्राहक नवा कीं जुना याचा उल्लेखही कृपया करावा.

२. देणगी शक्यतों चेकनें पाठवूं नये. पाठविणें अपरिहार्य असेल तर 'सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट' या नांवेंच चेक लिहावा.

अवास्तव सुखोपभोगांच्या मृगजळापाठीं तृष्णेच्या पूर्तीच्या आशेनें धावणारा मनुष्य भिन्न भिन्न देवतांच्या उपासना करून सुख मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो. पण मनुष्याची सुखाची कल्पना अवास्तव आणि अज्ञान मूलक असल्यामुळें ती पूर्ण होत नाहीं. मग तो देवाला दोष देत बसतो. आपण कडुलिंबाचें झाड लावायचें आणि त्याला मधुर आंबे लागावेत म्हणून देवाकडे प्रार्थना करायची आणि आंबे लागले नाहींत म्हणून देवाला दोष देणें शहाणपणाचें ठरेल का? या बाबतींत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात—

मग नाना हेतु प्रकारें। यथोचितें उपचारें।
मानिलीं देवतांतरें। उपासिती ॥ ७१ ॥
तेथ जें जें अपेक्षित। तें तैसेंचि पावती समस्त।
परी तें कर्मफळ निश्चित। वोळख तूं ॥ ७२ ॥
वांचूनि देतें घेतें आणिक। निभ्रांत नाहीं सम्यक।
एथ कर्मचि फळसूचक। मनुष्य लोकीं ॥ ७३ ॥
जैसें क्षेत्रीं जें पेरिजे। तें वांचूनि आन न निपजे।
कां पाहिजे तेंचि देखिजे। दर्पणाधारें ॥ ७४ ॥
नातरी कडेयातळवटीं। जैसा आपुलाचि बोलु किरीटी।
पडिसादु होऊनि उठी। निमित्त योगें ॥ ७५ ॥
तैसा समस्तां या भजना। मीं साक्षिभूतु अर्जुना।
एथ प्रतिफळे भावना। आपुलाली ॥ ७६ ॥ ज्ञानेश्वरी अ० ४

हे अर्जुना, सामान्य लोक मला आपल्यापेक्षां वेगळा मानतात आणि मग मनांत नाना प्रकारचे हेतु बाळगून, जें जें हवें असेल तें मिळविण्याकरतां भिन्नभिन्न देवतांची नाना प्रकारच्या उपचारांनी पूजा अर्चा करतात ॥ ७१ ॥ आणि त्यांनां जें अपेक्षित असतें तें मिळवितात. पण तें अपेक्षित फळ त्यांच्या कर्माचें फळ असतें. तें त्यांच्या कर्मामुळेंच मिळालेलें असतें हें नीट जाणून घे. (तें फळ मीं दिलेलें नसतें) ॥ ७२ ॥ (जोपर्यंत द्वैताची म्हणजे आपल्या परमेश्वरापेक्षां वेगळेपणाची जाणीव आहे तोंपर्यंत) मनुष्यलोकांत देणारा किंवा घेणारा कर्माशिवाय दुसरा कोणीही नाहीं. कर्मापासूनच फळ मिळत असतें. ॥ ७३ ॥ जमिनींत आपण जें बीज पेरतो त्याचेंच फळ आपणाला मिळत असतें. आपण जसे असतों तसेच आरशांत दिसतों, आपण जें पाहूं तेंच आरशांत आपणाला दिसतें, ॥ ७४ ॥ किंवा हे अर्जुना डोंगरांच्या कडेकपारींत आपलाच शब्द प्रतिध्वनीच्या रूपानें आपणाला ऐकूं येतो त्या प्रमाणें आपलेंच कर्म आपणाला फळ देत असतें. ॥ ७५ ॥ हे 'अर्जुना, विश्वप्रमाणेंच या सर्व' उपासनांचा, कर्मांचा मींच आधार असलों तरी लोक फळाच्या इच्छेनें कर्म करतात (माझ्या प्राप्तीच्या इच्छेनें करीत नाहींत) म्हणून त्यांना कर्मानुसार फळप्राप्ति होते. त्यांचें कर्मच त्यांना फळ देतें. प्रत्येकाला त्याच्या भावनेनुसार, कर्मानुसार फळप्राप्ति होते. ॥ ७६ ॥

विश्वात्मक परमेश्वराशीं एकरूप होण्याकरतां कर्म करीत रहा. परमेश्वराशीं तादात्म्य पावणें हेंच खरें सुख आहे.

# लोहपरिसाची न साहे उपमा....

चित्रं वटतरोर्मूले वृद्धाः शिष्या गुरुर्युवा ।
गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु छिन्नसंशयाः ॥

—श्रीमदाद्य शंकराचार्य

एका वटवृक्षाखालीं एक लोकविलक्षण आश्चर्यकारक दृश्य दृश्य दिसत होतें. शिष्य वृद्ध होते. गुरु तरुण होता. समाधिसुखांत मग्न असलेल्या त्या तरुण गुरूनें मौन धारण केलें होतें. पण त्यांचें तें मौन हेंच प्रवचन होतें. आनंदमय ब्रह्माचें साक्षात्कारी व्याख्यान होतें. सोदाहरण विवेचन होतें. यामुळें समोर बसलेल्या त्या ज्ञानवृद्ध शिष्यांचे सर्व संशय, शंकाकुशंका नष्ट झाल्या होत्या.

श्रीमच्छंकराचार्यांच्या दक्षिणामूर्ति स्तोत्रांतील हा श्लोक आहे. त्या स्तोत्रांत 'तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये' त्या सद्गुरु दक्षिणामूर्तीला नमस्कार असो असें पुनः पुनः म्हटलें आहे. भारतीय संस्कृतींत अनन्य साधारण महत्त्व असलेल्या 'गुरूचें' स्वरूप, महत्त्व, व 'गुरु' या संकल्पनेचें रहस्य 'दक्षिणामूर्तिस्तोत्र' व 'गुर्वष्टक' या दोन प्रसन्न पावन स्तोत्रांत स्पष्ट केलें आहे. अर्थात् हें वर्णन आध्यात्मिक ज्ञान करून देणाऱ्या, अध्यात्मविद्या शिकविणाऱ्या, आणि परमेश्वराचा, परब्रह्माचा साक्षात्कार घडविणाऱ्या गुरूचें आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

गुरु म्हणजे गृणाति उपदिशति इति गुरुः म्हणजे जो ज्ञान देतो विद्या शिकवितो तो गुरु असा सामान्य अर्थ आहे. परंतु आचार्यांना 'अध्यात्मविद्या विद्यानाम्' 'सा विद्या या विमुक्तये' हा अर्थ अभिप्रेत आहे. जी विद्या सुखदुःखांच्या द्वन्द्वांतून मुक्त करून विशुद्ध निरपेक्ष आनंद मिळवून देते ती अध्यात्मविद्या सर्व विद्यांमध्यें श्रेष्ठ आहे. किंबहुना तीच खरी विद्या, आणि ती देतो, तिचा उपदेश करतो तो गुरु असाच अर्थ अभिप्रेत आहे. शंकराचार्यांना वेदशास्त्र शिकविणाऱ्या पंडितांविषयी विशेष उल्लेख न करतां त्यांना अद्वैताचें–अध्यात्मविद्येचें अनुभूतिपूर्ण शिक्षण देणाऱ्या गुरु गोविंदपादांचा सर्वत्र निर्देश केला जातो यांतील मर्म तेंच आहे. ज्ञानेश्वरांना 'श्रीगणेशाय नमः' शिकविणाऱ्या गुरूंची माहिती पहाण्यांत नाहीं. पण 'अवघें विश्वचि माझें घर' अशी स्थिर मति उत्पन्न करणारें विश्वरूप परमात्म्याचें साक्षात्कारपूर्ण ज्ञान करून देणाऱ्या निवृत्तिनाथांना 'गुरु' म्हणून ज्ञानेश्वरांनी उल्लेख केला आहे. धुळीच्या पाटीवर 'श्री' काढायला शिकविणाऱ्या, कवडीदमडीचें, तोलामापाचें क्रयविक्रयाचें शिक्षण देणाऱ्या गुरुजींचें तुकारामांना विशेष स्मरण नाहीं पण 'विष्णुमय जग' ही अनुभूति प्राप्त करून देणाऱ्या गुरुचा 'सद्गुरुरायें कृपा मज केली' असा आवर्जून उल्लेख केला आहे. पुंडलीक वरद बिटेवरी उभ्या राहिलेल्या मूर्तींतच विठ्ठल आहे, परमेश्वर आहे असें मानून त्याची नितान्त भक्ति करणाऱ्या, आणि विशुद्ध भक्तीनें त्या पाषाणमय मूर्तीला, हसायला, रडायला, बोलायला व जेवायला लावणाऱ्या भक्तशिरोमणि नामदेवाला येथें तेथें सर्वीकडे परमेश्वर आहे, विश्वांतील वस्तुमात्रांत परमेश्वर आहे ही जाणीव विसोबा खेचरांनी करून दिली म्हणून ते नामदेवांचे गुरु मानले गेले. यावरून एकच निष्कर्ष निघतो तो म्हणजे जो 'आध्यात्मिक' ज्ञान देतो, जो परमात्म्याच्या सर्वात्मतेची जाणीव करून देतो, अनुभूति आणून देतो. त्याला गुरु म्हणावें.

अध्यात्मविद्येशिवाय इतर सर्व चौदा विद्या चौसष्ट कला भौतिक आहेत. त्यांचें शिक्षण, ज्ञान देणाऱ्यांना शिक्षक, अध्यापक, आचार्य, उपाध्याय, पंडित, पुरोहित म्हणण्याचा प्रघात होता. आजही शिक्षक, गुरुजी, मास्तर, आचार्य, प्राचार्य, अध्यापक, प्राध्यापक, उस्ताद, वस्ताद वगैरे शब्द वापरले जातात. ज्ञान (मग तें भौतिक असो वा आध्यात्मिक असो) जो देतो तो आपल्यापेक्षां (घेणाऱ्यापेक्षां) मोठा असतो, श्रेष्ठ असतो या भावनेनें शिक्षकापासून उस्तादापर्यंत सर्वांना व्यवहारांत गुरु म्हटलें जातें. आदर व्यक्त करण्याच्या दृष्टीनें त्यांत कांहीं गैर नसलें तरी 'गुरु' व इतर शिक्षक वगैरे शब्द, यांतील मूलभूत भेद लक्षांत ठेवणें इष्ट आहे.

गुरुचें महिमान वर्णन करतांना 'लोहपरिसाची न साहे उपमा' असें म्हटलें जातें. परिस लोखंडाचें सोनें बनवितो पण लोखंडाला परिस बनवूं शकत नाहीं; तर गुरु शिष्याला 'आपणासारिखे करिती तात्काळ,' म्हणजे शिष्याला आपल्याशीं एकरूप, गुरुस्वरूप परमात्मस्वरूप करतात. म्हणून गुरुला परिसाची उपमा देणे उचित नाहीं. श्रीमच्छंकराचार्योंनीं 'दृष्टान्तो नैव दृष्टः त्रिभुवनजठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः' ज्ञान देणाऱ्या सद्गुरुचें त्रिभुवनांतील कोणत्याही वस्तूच्या दृष्टांतानें वर्णन करतां येणार नाहीं असें म्हटलें आहे.

अशा रीतीनें विश्वात्मक परमेश्वराशीं एकरूपत्वाची अनुभूति प्राप्त करून देणारें ज्ञान देणारा असा पारंपरिक व पारिभाषिक अर्थ असलेल्या गुरु शब्दाचे छंदःशास्त्रांत 'एकमात्रो भवेत् ऱ्हस्वः (लघु) द्विमात्रो गुरु उच्यते', म्हणजे ज्याच्या उच्चारणाला एकमात्रा वेळ लागतो तो लघु व ज्याच्या उच्चारणाला दोनमात्रां इतका वेळ लागतो त्याला गुरु ही संज्ञा दिली आहे. 'अ' हा लघु, आ हा गुरु. सामान्य व्यवहारांत त्यांना ऱ्हस्व दीर्घ म्हटलें जातें. विश्वांतील मूलभूत पदार्थांचें परिगणन करणाऱ्या कणाद प्रभृति न्यायशास्त्रकारांनीं रूपरसादि चोवीस मूलभूत गुणांत 'गुरुत्व' हा एक गुण मानला आहे. तो पृथ्वी व जल यांचे ठिकाणीं असतो. गुरुत्व हा गुण आणि गुरुत्वाकर्षणशक्ति यांचें जवळचें नातें आहे. शिवाय गुरु म्हणजे भार, मोठा, व्यापक, श्रेष्ठ, देवांचा गुरु बृहस्पति, असे अनेक अर्थ आहेत. या सर्व अर्थांत 'श्रेष्ठता' अभिप्रेत आहे. पण ही श्रेष्ठता 'सापेक्ष' आहे. अ पेक्षां ब श्रेष्ठ आहे असा अभिप्राय असतो. आरंभीं श्लोकांत अपेक्षित असलेला गुरुशब्दाचा पारंपारिक आध्यात्मिक अर्थमात्र पूर्णतया निरपेक्षतेचा सूचक आहे. गुरु म्हणजे साक्षात परब्रह्म. तें सर्वश्रेष्ठ, सर्वव्यापक, सर्वशक्तिमत्, तेजोमय, आनंदमय (आनंदं ब्रह्मणो रूपं विजानीयात्) आहे. त्याची श्रेष्ठता आनंदमयता पूर्णतया निरपेक्ष आहे. त्याचें अमक्यापेक्षां किंवा अमक्या इतका श्रेष्ठ आहे असें वर्णन करणें शक्य नाहीं. कारण तसें सर्व व्यापक दुसरें तत्त्वच नाहीं.

हें लक्षांत घेऊनच आचार्यांनीं दक्षिणामूर्तिगुरुचें वर्णन केलें आहे. त्यांत सततवर्धमान होणाऱ्या विस्तार पावणाऱ्या वटवृक्षाच्या मुळांत 'बीजांत' असणाऱ्या आश्चर्यकारक गुरुला गुरुत्वाला वंदन केलें आहे. एवढा प्रचंड वटवृक्ष अगदीं लहान बीजांतून निर्माण झाला. सामान्य लोकांना तो वटवृक्ष दिसतो, त्याच्या छायेचा ते फायदाही घेतात पण त्याच्या बीजाची, मूलतत्त्वाची त्यांना जाणीवहि नसते. पण आचार्यांना तें जाणवलें. वटवृक्षांच्या रूपानें सारें विश्व त्यांच्या ज्ञानचक्षूंसमोर उभें राहिलें. विशाल वटवृक्षाचें बीज लहान. तर वटवृक्षापेक्षां अनंतपटीनें

विश्वात्मतम महत्तम दृश्यमान विश्वाचें बीज 'अणोरणीयान' अणुहून सूक्ष्म आहे. बीजरूपानें लहानांत लहान आहे. त्याचें आविष्कृत दृग्गोचररूप 'महतो महीयान्' सर्वांत मोठें आहे. अनंत आहे. अपार आहे. जसा बीजाशिवाय वृक्ष नाहीं तसें बीजभूत परब्रह्मतत्वाशिवाय विश्व नाही. वटवृक्ष दिसतो पण त्याच्या आकारानें विकसित होणारें बीज दिसत नाहीं. त्या प्रमाणें अनंत अपार विशाल विश्व दिसतें परंतु जें विश्वरूपानें साकार झालें तें ब्रह्मतत्वरूप बीज दिसत नाहीं. सामान्य लोकांना तें दिसत नाहीं म्हणून ते हें विश्व आपोआप निर्माण झालें असें म्हणतात. पण अनंताचा वेध घेऊं शकणारी दिव्य ज्ञानदृष्टि लाभलेले शंकराचार्य विश्व आपोआप निर्माण झालें असें म्हणत नाहींत. कारण त्यांना ह्या विश्वाच्या कारणाचा साक्षात्कार झालेला होता. 'चित्रं वट-तरोर्मूले' त्या वटवृक्षाच्या मुळांत–बीजांत आश्चर्यकारक विश्वविलक्षण असलेल्या ब्रह्मतत्वाचें दर्शन झालें.

तें तत्व 'गुरु' आहे. सर्वव्यापक आहे. चिरतरुण आहे. परिणामरूप विश्व वृद्ध होतें, नष्ट होतें म्हणजे रूपान्तरित होते. परंतु तें परब्रह्मरूपी गुरुतत्व शाश्वत असतें. त्यापासून सातत्यानें वैविध्यानें नटलेल्या विश्वाचें निर्माण सातत्यानें होत असतें. आचार्यांनी 'वृद्धाः शिष्याः गुरुः युवा' असें जे वर्णन केलें आहे त्यांतील मर्म हेंच आहे. भोवतालीं पसरलेलें सारें विश्व त्या गुरुतत्वाच्या शासनानुसार चालत असतें म्हणून तें शिष्यरूप आहे. तें वृद्ध आहे. तें विश्व कोट्यावधि वर्षांचें जुने आहे, असें आपण मानतो, पण त्याचें 'कारण' किती जुनें आहे, पुराणें आहे हें आपणाला माहीत नाहीं. पृथ्वीपेक्षां सूर्य वयस्कर आहे. सूर्यापेक्षांही वयस्कर ग्रह नक्षत्र, तारे, अनेक आहेत. ज्यांचा प्रकाश पृथ्वीवर पोंचायला अनेक वर्षे लागतात असेही ज्ञात अज्ञात ग्रहलोक आहेत. ज्यांच्या उत्पत्तीची कालगणना करायला संख्या अपुरी पडेल, तेथें त्या अनंत-कोटिब्रह्मांडाच्या कारणाच्या उत्पत्तीची कालगणना कोण करणार, कशानें करणार! म्हणूनच आचार्य म्हणतात 'वृद्धाः शिष्याः गुरुर्युवा.' विश्व कालाच्या आधीन आहे तर परब्रह्मतत्व कालातीत आहे. जें काळाच्या पलीकडे आहे त्याची काळानें गणना कशी करणार! अशा तऱ्हेनें अनादि अनंत गुरुस्वरूपी परतत्व सतत कार्यरत असल्यामुळें 'युवा' म्हटलें आहे. तरुण सतत कार्यरत असतो, या व्यावहारिक अनुभवामुळें लाक्षणिक अर्थानें 'गुरुर्युवा' म्हटलें आहे. वस्तुतः तें अथर्वशीर्षांत वर्णन केल्याप्रमाणें 'अवस्थात्रयातीत' आहे. बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य यांच्या पलीकडे तें आहे.

अशा या विश्वात्मक अलौकिक गुरुचें व्याख्यान प्रवचन (गुरोस्तु मौनं व्याख्यानं) मौनात्मक असतें. लौकिक गुरुंप्रमाणें आपला आशय व्यक्त करण्याकरतां त्याला शब्दांचें माध्यम लागत नाहीं. त्याच्या केवळ अस्तित्वानें, सान्निध्यानें, स्पर्शानें किंवा दृष्टिपातानें सुद्धां शिष्याला 'आत्मबोध' होऊं शकतो. त्याकरतां शब्दांची व्याख्यानाची प्रवचनाची आवश्यकता नसते. ज्ञानेश्वरांनीं म्हटल्याप्रमाणें 'शब्दाआधीं झोंबिजे प्रमेयासी' अशी अवस्था असते. सद्गुरुंच्या मुखांतून उपदेशाचे शब्द बाहेर पडण्यापूर्वी त्या शब्दांचें प्रमेय श्रद्धाळू सच्छिष्याच्या अन्तःकरणांत प्रतिबिंबित होतें. आत्मतत्वाचा बोध होतो. अथांग पसरलेल्या शब्दहीन नीलवर्ण महासागराच्या दर्शनानें चैतन्य महाप्रभूंना भगवान् श्रीकृष्णाचा साक्षात्कार झाला. त्यांचे देहभान हरपलें. ते

सागरांत, भगवत्स्वरूपांत विलीन झाले. अनेक तपस्व्यांना हिमालयाच्या निर्मल, पवित्र, उदात्त अन् उन्नत शिखरांच्या दर्शनानें परममंगल गौरीशंकररांचा साक्षात्कार झाला. आज सुद्धां गौरीशंकर शिखरांवर जाणाऱ्यांना तेथें नीरव शांततेचा, देश-घरदार-बायकामुलें इतकेंच नव्हे स्वतःचा देह सुद्धां विसरायला लावणाऱ्या अलौकिक आनंदाचा अनुभव येतो. एडमंड हिलरीचे त्या अर्थाचे उद्गार प्रसिद्ध आहेत. प्राचीन ऋषिमुनी त्या शाश्वत आनंदांत एकरूप होण्याकरतांच तेथें जात आणि रहात असत म्हणून तेथून परत आले नाहीत.

त्या नगाधिराज हिमालयातून उगम पावणाऱ्या भगवती भागीरथीच्या अखंड वाहणाऱ्या परमपावन प्रवाहांत पंडितराज जगन्नाथाला नितान्त वत्सल जगन्मातेचें, आदिशक्तीचें दर्शन झालें. तिच्या आनंदमयतेचा साक्षात्कार झाला आणि तो आनंदमय झाला, मुक्त झाला. ती गंगा, तो हिमालय, तो महासागर शब्द ही न बोलतां अनेक साधकांना अलौकिक आनंदाशीं एकरूप करूं शकले. आजही दिव्यत्वाची प्रचीति देणारीं तीं हिमालयाचीं विष्णुपदाला—आकाशाला भिडणारीं शिखरें साधकांना 'साद' देत असतात, आणि पूर्णतया निरपेक्ष विशुद्ध निःशब्द ब्रह्मानंदाची अनुभूति देत असतात. म्हणून सात्त्विक साधकांना, मुमुक्षूंना त्या ठिकाणीं 'गुरुत्व' प्रतीत होत असतें. आणि त्या गुरुच्या मौनांतून साधकांना-अनेक वर्षें तपस्या करणाऱ्यांना आत्मबोध होत असतो, आनंदाची निःसंशय प्रतीति येत असते.

अशा रीतीनें 'भूमा वै सुखम्' या उपनिषदांतील वचनाप्रमाणें तो भूमा म्हणजे गुरुत्व त्याची अनुभूति आणून देतो तो 'गुरु' हें स्पष्ट होतें. श्रीमच्छंकराचार्यांनी त्या सच्चिदानंदमय तत्वाचा 'दक्षिणामूर्तिगुरु' असा उल्लेख केला आहे, तोही मोठा अर्थपूर्ण आहे. दक्षिणा शब्दांत दक्ष धातू आहे. त्याचा वृद्धि—विकसनशीलता असा अर्थ आहे. विकास हीच ज्याची मूर्ति-आकृति तो दक्षिणामूर्ति. परमेश्वराला आपण 'विश्वमूर्ति' म्हणतों तेंच त्याच अर्थानें. दक्षिणामूर्ति म्हणजे परतत्वाच्या-परमेश्वराच्या विकसनशीलतेचें प्रतीक. त्याला गुरु म्हणावें, याचाच अर्थ असा होतो कीं गुरु हा विकसनशील—स्वतःचा व शिष्यांचा ही विकास करणारा असला पाहिजे.

दक्षिण, दाक्षिण्य, दक्षिणाग्नि, दक्षिणा, दक्षा इत्यादि शब्दांमध्यें विकास हाच अर्थ अभिप्रेत आहे. मेदिनी कोशांत दक्षा शब्द पृथ्वी या अर्थी दिला आहे. दक्षिणाग्निः हा प्रसिद्ध दक्षिण गार्हपत्य आहवनीय या तीन अग्नींपैकीं दक्षिणः अग्निः दक्षिणाग्निः म्हणजे सर्वोपयुक्त सर्वहितकारी अग्नि मानला गेला आहे. गुरुदक्षिणा इत्यादि ठिकाणीं प्रसिद्ध असलेल्या दक्षिणा शब्दाचा अर्थ 'या दातृग्रहीत्रोर्हितकारिणी सा दक्षिणा' असा स्मृति ग्रंथांतून आढळतो. देणारा व घेणारा या दोघांच्याही हिताला, उत्कर्षाला, विकासाला कारणीभूत होईल ती दक्षिणा. दक्षिणा शब्दाची ही पार्श्वभूमि पाहिली म्हणजे 'तस्मै श्री गुरुमूर्तये नम इदं श्री दक्षिणामूर्तये' यांतील मर्म लक्षांत येतें.

महान् भगवद्भक्त कबीरांच्या पुढील दोह्यांत वर्णन केलेलें गुरुचें महत्व व मोठेपण वरील विवेचनाला पुष्टि देणारेंच आहे.

ते म्हणतात—

गुरु गोविंद दोऊ खडे काके लागौं पाय।
बलिहारी गुरु आपने गोविंद दियो बताय॥

गुरु आणि परमेश्वर दोघेही पुढें उभे राहिले तर कोणाचे पाय धरावे? कोणाला शरण जावें? असा प्रश्न पडला तर गुरुलाच शरण जावें. तोच आपला खरा हितकर्ता आहे. तोच समोर उभ्या असलेल्या गोविंदाचें परमेश्वराचें खरें मूलभूत स्वरूप समजावून देतो.

सर्वसामान्यतः 'आपणाला हवें तें देतो तो परमेश्वर' अशी कल्पना असते. पण मागणाऱ्याला आपण कोण व आपल्या पार्यन्तिक हिताचें काय याचें ज्ञान नसतें, म्हणून तो शारिरिक वा मानसिक क्षणिक सुखाची इच्छा करतो व तसा वर तो देवाकडे मागतो आणि सुखाऐवजी दुःख भोगींत असतो. पुराणकालांत रावण कुंभकर्ण हिरण्यकशिपु भस्मासुर इत्यादिकांच्या कथा या बाबतींत प्रसिद्ध आहेत. आजही देवाच्या कृपेनें (अभ्यास न करतां) पास होऊं इच्छिणारे विद्यार्थी हें लक्षांत घेत नाहींत कीं 'पास झाल्याच्या क्षणिक आनंदाकरतां पुढे आयुष्यभर अक्षमतेचें (अभ्यासाभावीं) अतएव अपमानित जिणें जगावें लागतें. 'वरहि बरावयास पाहिजे समज' हेंच खरें. ती समज गुरु देतो म्हणून गुरुला शरण जाणें इष्ट असें कबीराचें म्हणणें आहे.

या वरील सर्व विवेचनावरून गुरु हा त्या सच्चिदानंदमय परत्वाचें प्रतीक आहे. आत्मतत्वाचा परमात्मतत्वाचा साक्षात्कार घडविणारा आहे. तो परमात्मस्वरूप आहे. आहे हें स्पष्ट होतें.

असा गुरु असतो का ? आहे का ? आपणाला भेटेल का ?

असे प्रश्न आज आपल्या मनांत उभे रहातात. प्रश्न तीन पण उत्तर एकच. होय. आपलें मन विशुद्ध असेल व आत्मज्ञानाविषयीं उत्कट जिज्ञासा असेल तर आजही सद्गुरु मिळतील. गोविंदपाद शंकराचार्यांची वाट पहात होते. निवृत्तिनाथांना गुहेंत गुरु आपोआप भेटले तर तुकारामांना गुरुनें स्वप्नांत येऊन दर्शन दिलें, उपदेश दिला. दया दाक्षिण्यादि गुणांचें पालन करीत विशुद्ध मनानें आचरण करीत राहिलों, परमेश्वर विश्वांतील वस्तुमात्रांत आहे या जाणिवेनें, निष्ठेनें व्यवहार करीत राहिलों तर परमेश्वराच्या विश्वात्मकेची अनुभूति आणून देणारा सद्गुरु आपणालाही लाभेल यांत शंका नाहीं. निरपेक्ष आणि शुद्ध मनानें भगवचिंतन करीत कर्म करीत रहा. योग्य वेळीं गुरुची प्राप्ति झाल्यावर त्याला शरण जातांना एक पथ्य अवश्य पाळलें पाहिजे. 'जेणें विठ्ठलमात्रा घ्यावी तेणें पथ्यें सांभाळावी' या तुकाराम महाराजांच्या उपदेशाप्रमाणें संकुचित वैयक्तिक ऐहिक सुखोपभोगांच्या लालसेनें गुरुला शरण जाणें, त्या दृष्टीनें गुरु करणें हें कुपथ्य आहे. तें करूं नये. परब्रह्माचें विराट दर्शन झाल्यावर अर्जुन 'शाधि मां त्वां प्रपन्नम्' मी तुझा शिष्य आहें. माझें हित अनाहित मला समजत नाहीं. मला तूंच योग्य तें मार्गदर्शन कर असें म्हणून कृष्णाला शरण गेला, त्याच भावनेनें गुरुला शरण जावें. 'अहमज्ञो न जानामि किं वरं न च किं वरम् । यदिच्छसि देवेश तत्तदेवास्ति मे प्रियम्, ही भावना सदैव अन्तःकरणांत ठेविली पाहिजे.

कुंडलिनी जागृत करण्याची विद्या मला शिकवा, माझ्यांत शक्तिपात करा, मला परमेश्वराचा साक्षात्कार घडवा अशा मागण्या सद्गुरुजवळ करू नका. मागणी करून त्या गोष्टी मिळत नाहींत योग्यता नसतां हट्टानें मागून त्या मिळविल्या तर हानिकारक ठरतात असा अनुभव आहे, म्हणून कसलाही आग्रह न बाळगतां निरपेक्षपणें, विशुद्ध मनानें भगवत्स्मरण करीत राहिल्यानें आपोआप सद्गुरुची प्राप्ति होईल आणि योग्य वेळीं कुंडलिनी स्वयं जागृत होऊन शक्तिपातानें अनुभवाला येणारा परतत्वाचा साक्षात्कार होईल.

श्रीशंकराचार्यविरचितम्—

# श्रीदक्षिणामूर्तिस्तोत्रम्।

दक्षिणामूर्ति म्हणजे सच्चिदानंदमय परब्रह्म-ज्ञानाची अधिष्ठात्री देवता. शिक्षणाचा आद्य प्रवर्तक सदाशिव आदि गुरु. त्याचें स्वरूप व रहस्य सूचित करणारें हें शंकराचार्योंचें प्रसन्न स्तोत्र व त्याचा अर्थ पुढें देत आहों.

विश्वं दर्पणदृश्यमाननगरीतुल्यं निजान्तर्गतम्।
पश्यन्नात्मनि मायया बहिरिवोद्भूतं यथा निद्रया॥
यः साक्षात्कुरुते प्रबोधसमये स्वात्मानमेवाद्वयम्।
तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये॥ १॥

बीजस्यान्तरिवांकुरो जगदिदं प्राङ्निर्विकल्पं शनैः।
मायाकल्पितदेशकालकलनावैचित्र्यचित्रीकृतम्॥
मायावीव विजृम्भयत्यपि महायोगीव यः स्वेच्छया।
तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये॥ २॥

यस्यैव स्फुरणं सदात्मकमसत्कल्पार्थकं भासते।
साक्षात् तत्त्वमसीति वेदवचसा यो बोधयत्याश्रितान्॥
यत्साक्षात्करणाद् भवेन्न पुनरावृत्तिर्भवांभोनिधौ।
तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये॥ ३॥

नानाच्छिद्रघटोदरस्थितमहादीपप्रभाभास्वरम्।
ज्ञानं यस्य तु चक्षुरादिकरणद्वारा बहिः स्पंदते॥
जानामीति तमेव भान्तमनुभात्येतत् समस्तं जगत्।
तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये॥ ४॥

देहं प्राणमपीन्द्रियाण्यपि चलां बुद्धिं च शून्यं विदुः।
स्त्रीबालान्धजडोपमास्त्वहमिति भ्रान्ता भृशं वादिनः॥
मायाशक्तिविलासकल्पितमहाव्यामोहसंहारिणे।
तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये॥ ५॥

राहुग्रस्तदिवाकरेन्दुसदृशो मायासमाच्छादनात्।
सन्मात्रः करणोपसंहरणतो योऽभूत्सुषुप्तः पुमान्॥
प्रागस्वाप्समिति प्रबोधसमये यः प्रत्यभिज्ञायते।
तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये॥ ६॥

बाल्यादिष्वपि जाग्रदादिषु तथा सर्वास्ववस्थास्वपि ।
व्यावृत्तास्वनुवर्तमानमहमित्यन्तःस्फुरन्तं सदा ॥
स्वात्मानं प्रकटीकरोति भजतां यो मुद्रया भद्रया ।
तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये ॥ ७ ॥

विश्वं पश्यति कार्यकारणतया स्वस्वामिसंबंधतः ।
शिष्याचार्यतया तथैव पितृपुत्राद्यात्मना भेदतः ॥
स्वप्ने जाग्रति वा य एष पुरुषो मायापरिभ्रामितः ।
तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये ॥ ८ ॥

भूरम्भांस्यनलोऽनिलोऽम्बरमहर्नाथो हिमांशुः पुमान् ।
इत्याभाति चराचरात्मकमिदं यस्यैव मूर्त्यष्टकम् ॥
नान्यत्किंचन विद्यते विमृशतां यस्मात्परस्माद्विभोः ।
तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये ॥ ९ ॥

सर्वात्मत्वमिति स्फुटीकृतमिदं यस्मादमुष्मिन् स्तवे ।
तेनास्य श्रवणात्तदर्थमननात् ध्यानाच्च संकीर्तनात् ॥
सर्वात्मत्वमहाविभूतिसहितं स्यादीश्वरत्वं स्वतः ।
सिध्येत् तत्पुनरष्टधा परिणतं चैश्वर्यमव्याहतम् ॥ १० ॥

वटविटपिसमीपे भूमिभागे निषण्णम् ।
सकलमुनिजनानां ज्ञानदातारमारात् ॥
त्रिभुवनगुरुमीशं दक्षिणामूर्तिदेवम् ।
जननमरणदुःखच्छेददक्षं नमामि ॥ ११ ॥

चित्रं वटतरोर्मूले वृद्धाः शिष्या गुरुर्युवा ।
गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु छिन्नसंशयाः ॥ १२ ॥

ॐ नमः प्रणवार्थाय । शुद्धज्ञानैकमूर्तये ।
निर्मलाय प्रशान्ताय । दक्षिणामूर्तये नमः ॥ १३ ॥

निधये सर्वविद्यानां । भिषजे भवरोगिणाम् ।
गुरवे सर्वलोकानां । दक्षिणामूर्तये नमः ॥ १४ ॥

मौनव्याख्याप्रकटितपरब्रह्मतत्त्वं युवानम् ।
वर्षिष्ठान्तेवसदृषिगणैरावृतं ब्रह्मनिष्ठैः ॥
आचार्येन्द्रं करकलितचिन्मुद्रमानंदरूपम् ।
स्वात्मारामं मुदितवदनं दक्षिणामूर्तिमीडे ॥ १५ ॥

इति श्रीमच्छंकराचार्यविरचितं श्रीदक्षिणामूर्तिस्तोत्रं संपूर्णम्

# विश्व हें प्रतिबिंब आहे....

सजीव वा निर्जीव वस्तु आरशांत प्रतिबिंबित होते त्या प्रमाणें ज्याच्या अन्तःकरणांत सारें विश्व प्रतिबिंबित होतें त्या वेळीं तो, निद्रिस्त मनुष्य स्वप्नांतील घटना त्या वेळीं खऱ्याच समजतो त्याप्रमाणें मायेनें आवृत असल्यामुळें तें प्रतिबिंबात्मक विश्व खरें आहे असें समजूं लागतो. पण जाग आल्यावर स्वप्नसृष्टीचा फोलपणा जसा कळतो त्या प्रमाणें प्रबोधसमये—ज्ञानप्राप्ती झाल्यावर (आपल्या खऱ्या रूपाची अनुभूति आल्यावर) हें दृश्यमान-भासमान विश्व त्या परमात्म स्वरूपाचें प्रतिबिंब आहे (बिंब नव्हे) हें तो समजतो, आणि बिंबरूप परमात्म्याचें आणि आत्म्याचें अद्वैत अनुभवाला येतें. या ज्ञानाला—अनुभवाला कारणीभूत असलेल्या गुरुस्वरूप दक्षिणामूर्तीला नमस्कार असो. ॥ १ ॥

पुढें अंकुरित पुष्पित फलित होणारा विशाल वृक्ष पूर्वी ज्याप्रमाणें सूक्ष्म बीजांत सामावलेला असतो त्या प्रमाणें निर्मितीच्या पूर्वी हें सारें विशाल विश्व आपल्यांत बीजरूपानें बाळगून ठेवतो आणि नंतर अज्ञानजन्य नामरूपांनीं भिन्नभिन्न भासणारें हें चित्रविचित्र विश्व, एकाद्या महान् जादूगाराप्रमाणें किंवा एकाद्या महायोग्याप्रमाणें केवळ आपल्या इच्छामात्रानें निर्माण करतो त्या श्रीगुरुस्वरूप दक्षिणामूर्तीला नमस्कार असो. ॥ २ ॥

अज्ञानी जनांना सद्रूपानें आणि ज्ञानी जनांना असद्रूपानें भासमान होणारें हें विश्व ज्याच्या स्फुरणानें (शक्तीनें—मायेनें) निर्माण झालें आणि जो 'तत्त्वमसि' या वेदवाक्यानें आत्मा व परमात्मा यांचें ऐक्य समजावून देतो व ज्यानें केलेल्या त्या उपदेशाच्या अनुभवानंतर संसारसागरांतील जन्ममरणादि दुःखें नष्ट होतात त्या गुरुस्वरूप दक्षिणामूर्तीला नमस्कार ॥ ३ ॥

अनेक छिद्रें असलेल्या घटांत प्रखर प्रकाशाचा दीप ठेवला म्हणजे त्याचें तेज त्या छिद्रांतून बाहेर पडून भोवतालचा भाग प्रकाशित करतें त्या प्रमाणें इंद्रियांच्या द्वारानें बाहेर पसरणाऱ्या ज्याच्या ज्ञानमय प्रकाशमय आत्म्याचें तेज बाहेर पसरतें. व त्या प्रकाशामुळेंच सर्व विश्व प्रकाशमान होतें असें मला वाटतें, म्हणून त्या गुरुस्वरूप दक्षिणामूर्तीला नमस्कार असो. ॥ ४ ॥

अल्पज्ञ स्त्रीपुरुष, अज्ञान बाळकें मूढ किंवा अंधांप्रमाणें भ्रान्त असे भिन्न दर्शन(शास्त्र)कार मी म्हणजे देह, प्राण, इंद्रियें किंवा चंचल असलेली बुद्धि असें म्हणत असतात. आणि कांहींतर या दृश्यमान विश्वापेक्षां कांहीं वेगळें नाहींच (शून्यवादी) असें आग्रहानें प्रतिपादन करीत असतात. हे व अशा तऱ्हेचे अज्ञान जन्य भ्रम ज्याच्या कृपेनें नष्ट होतात त्या गुरुस्वरूप दक्षिणामूर्तीला नमस्कार असो. ॥ ५ ॥

सदैव प्रकाशमान-प्रकाशमय सूर्याला राहूनें ग्रासलें असतां कांहीं काळ जसा त्याचा प्रकाश अवरुद्ध होतो, त्याचें अस्तित्व जाणवत नाहींसें होतें त्याप्रमाणें, सर्व इंद्रियांचा व्यवहार थांबला असल्यानें 'सुषुप्ति' (गाढनिद्रा)मध्यें, चिरंतन अस्तित्व असलेल्या आत्म्याचें भान खंडित होतें. परंतु जागृति झाल्यावर मी पूर्वी झोपलों होतों असें स्मरण होतें. त्यावरून त्या सुषुप्तिअवस्थेंतही आत्म्याचें अस्तित्व असल्याची जाणीव होते. अशा या जाणिवेचें स्फूर्तिस्थान असलेल्या गुरुस्वरूप दक्षिणामूर्तीला नमस्कार असो. ॥ ६ ॥

जो 'भद्रा' नांवाच्या मुद्रेनें शिष्यांसमोर स्थिरपणें आसनस्थ राहून, बाल्य तारुण्य, जागृति निद्रा इत्यादि सतत परिवर्तनशील अवस्थांमध्यें मुद्दां त्यां सर्वांत अनुस्यूत असलेल्या आणि

सदैव स्फुरण पावणाऱ्या आत्म्याचें दर्शन घडविणाऱ्या श्रीगुरुस्वरूप दक्षिणामूर्तीला नमस्कार असो. ॥७॥

चिच्छक्ती विपर्यांच्या अज्ञानानें भ्रान्त झालेला हा पुरुष (देहोपाधिविशिष्ट आत्मा) या विश्वाकडे, कार्यकारणभाव, स्वस्वामिभाव, गुरुशिष्य–पितापुत्र इत्यादि भेदांनी स्वप्नांत किंवा जाग्रतावस्थेमध्येंही पहात असतो. विश्वाकडे भेदभावनेनें पहाण्याचें हें अज्ञान ज्याच्या कृपेनें नष्ट होतें त्या गुरुस्वरूप श्री दक्षिणामूर्तीला नमस्कार असो. ॥८॥

पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, सूर्य, चंद्र व पुरुष (देहांतर्गत आत्मा) या त्या परब्रह्माच्याच आठ मूर्ति आहेत. विचार करणाऱ्यांना या विश्वांत परमात्म्यापेक्षां वेगळें असें कांहीही भासत नाहीं. हें सर्वत्र परब्रह्म पहाण्याचें ज्ञान ज्याच्यामुळें प्राप्त होतें त्या गुरुस्वरूप दक्षिणामूर्तिला नमस्कार असो. ॥९॥

या स्तोत्रांत परमात्म्याच्या सर्वात्मतेचें वर्णन केलें आहे म्हणून त्याच्या मननानें, पठनानें आणि संकीर्तनानें सर्व विभूतिसहित परमेश्वराची प्राप्ति होईल आणि आठ विभूतींच्या ठिकाणी असलेलें संपूर्ण 'ऐश्वर्य' प्राप्त होईल. (ईश्वरस्य भावः ऐश्वर्यम् म्हणजेच ईश्वरत्व) ॥१०॥

वटवृक्षाजवळ भूमीवर बसून, भोंवतालीं बसलेल्या मुनिजनांना सतत ज्ञान देणाऱ्या आणि जननमरणादि दुःखांचा विच्छेद करण्यांत दक्ष असलेल्या त्रैलोक्याधिपति दक्षिणामूर्ति देवतेला नमस्कार असो. ॥११॥

एका वटवृक्षाखालीं फार मोठें आश्चर्य पहायला मिळालें. शिष्य वृद्ध आहेत. गुरु तरुण आहे. मौन हेंच प्रवचन आहे, परंतु त्या मौनानेंच शिष्यांच्या मनांतील सर्व संदेह (शंका कुशंका) नष्ट झालेले आहेत. ॥१२॥

प्रणवमय, ज्ञानमूर्ति, निर्मल आणि प्रशान्त अशा आद्यगुरु दक्षिणामूर्तीला नमस्कार असो. ॥१३॥

सर्व विद्यांचा निधि, भव (सांसारिक) रोग्यांचे वैद्यराज व सर्वांचे गुरु असलेल्या दक्षिणामूर्तीला नमस्कार असो. ॥१४॥

ब्रह्मज्ञानाबद्दल उत्कंठा असलेल्या अनेक वृद्ध तपस्व्यांच्या मध्यें बसून, आपल्या मौन प्रवचनानेंच त्या तपस्व्यांचें शंकानिरसन करणाऱ्या, त्या चिन्मुद्रा धारण केलेल्या, प्रसन्न, सुखी, व आत्मानंदांत मग्न असलेल्या तरुण दक्षिणामूर्तीला वंदन करतों. त्याची स्तुति करतों. ॥१५॥

दादरला देणगी हातीं देण्याचा पत्ता :
श्री गंगाधर प्रिंटिंग प्रेस
वेस्टर्न रेल्वे फूटब्रिजच्या समोर
दादर, मुंबई ४०० ०२८

देणगी मनीऑर्डरनें धाडण्याचा पत्ता—
श्रीधर भालचंद्र आणि कंपनी
कापडाचे व्यापारी.
१४८ प्रार्थना समाज नाका, गिरगांव, मुंबई ४

# नैवेद्य समर्पण....

आपले आचार अत्यंत अर्थपूर्ण आहेत. ते मानवी शरीराच्या व मनाच्या विकासाच्या दृष्टीनें खूप विचार करून रूढ केलेले आहेत. देवाला नैवेद्य दाखविण्याचा आचार त्या दृष्टीनें खूपच उद्बोधक आहे. नैवेद्य समर्पण करणें या वाक्याचें नैवेद्य दाखविणें हें 'प्राकृत' रूप आहे. संत नामदेवांनीं समर्पण केलेला नैवेद्य पांडुरंगानें भक्षण केला होता, बाकी लोकांनीं नैवेद्य दाखविलेला—आणि दाखवून परत आणलेलाच असतो. किंबहुना देवाचा प्रसाद मिळावा या भावनेनेंच आपण प्राकृत माणसें नैवेद्य दाखवीत असतों. अर्थातच तो आम्हीं परत आणीत असतों म्हणून समर्पण करणें या ऐवजीं दाखविणें हा शब्द रूढ केला असावा असें वाटतें. असो.

नैवेद्य समर्पण करण्याचा विधि—आचार असा आहे. आवाहन—पूजन अभिषेक झाला म्हणजे, देवासमोर पाण्यानें मंडल करून त्यावर नैवेद्याचें पात्र ठेवतों. पात्रांतील पदार्थांवर तुलसी पत्र ठेवतों. नंतर नैवेद्यं समर्पयामि असें उदक सोडून ॐ प्राणाय स्वाहा (मुखाला अन्न भरवतों त्या पद्धतीनें व भावनेनें हातांत अन्न घेऊन देवाला भरविण्यासारखी उजव्या हाताची हालचाल करीत) ॐ अपानाय स्वाहा ॐ व्यानाय स्वाहा ॐ उदानाय स्वाहा ॐ समानाय स्वाहा असें म्हणून, एकंदर पांच वेळां अन्न अर्पण करतो. (पांच घांस भरवितों असें म्हणण्यासही हरकत नाहीं.) नंतर नैवेद्यमध्येपानीयं समर्पयामि असा संकल्प करून (म्हणून) देवाला पळीभर पाणी अर्पण करीत असतो. नंतर पहिल्याप्रमाणें ॐ प्राणाय स्वाहा वगैरे मंत्र म्हणून पांच वेळां अन्न निवेदन करून मग हस्तप्रक्षालनार्थं, मुखप्रक्षालनार्थं म्हणून पळीनें पाणी अर्पण करतो. व देव जणुं कांहीं आपल्या हातानेंच पंचपक्वान्नांचें जेवण जेवले आहेत या भावनेनें हात पुसणें व त्याला सुगंधी द्रव्य लावणें इत्यादि उपचारांऐवजीं 'करोद्वर्तनार्थे चंदनं...समर्पयामि' असें म्हणतों व शेवटीं देव जेवल्यामुळें आपणास झालेला आनंद व्यक्त करण्याकरतां नमस्कार करून नैवेद्याचा विधि पूर्ण करीत असतों.

या नैवेद्य समर्पणाच्या आचारांत प्राणाय-स्वाहा म्हणून नैवेद्य अर्पण करीत असतां कांहीं लोक डाव्या हातानें आपले डोळे मिटून घेत असतात, तर कांहीं डावा हात आपल्या हृदयावर ठेवीत असतात. या पद्धतीला आधारभूत वचन आमच्या वाचनांत आलेलें नाहीं परंतु वरील दोन्ही आचार अर्थपूर्ण आहेत यांत शंका नाहीं.

बहिर्मुख दृष्टीला अन्तर्यामी देवाचें—आत्म्याचें विस्मरण होत असतें म्हणून दृष्टि अन्तर्मुख ठेवून अन्तरात्मा आणि पूजोपचाराकरतां आवाहन केलेला देवमूर्तिरूप आत्मा एकच आहे हें अनुसंधान कायम रहावें याकरतां दृष्टि अन्तर्मुख ठेवणें हा आशय डोळे मिटून नैवेद्य दाखविण्याच्या आचाराच्या मुळाशी आहे.

त्याच प्रमाणें नैवेद्य समर्पण करतांना डावा हात हृदयावर ठेवण्याच्या प्रथेतही महत्वाचा आशय आहे. गायत्री मंत्राचा जप करतांना उजव्या हाताच्या आंगठ्यांत जानवें धरून तो हात हृदयावर ठेवण्याची प्रथा आहे, त्याच प्रमाणें गोमुखीसह उजवा हात हृदयाशीं धरून किंवा नुसत्या माळेसह हृदयाशीं हात धरून देवतांचा जप करण्याची प्रथा आहे. परमेश्वर माझ्या हृदयांत आहे त्याचाच मी जप करीत आहें, याचें सतत

अनुसंधान रहावें हाच वरील पद्धतीचा आशय आहे.

आपल्या शरीरांतील आत्म्याचें अस्तित्व प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान नांवाच्या पांच वायुरूप प्राणांच्या रूपानें जाणवतें म्हणून आपण प्राण पांच आहेत असें समजतों व त्या समजुतीला अनुसरून त्यांना पांच घास अन्न समर्पण करतो. अगदीं नांव घेऊन प्रत्येकाला अन्न समर्पण करतों.

नैवेद्य समर्पणाच्या आचारांत 'नैवेद्यमध्ये पानीयं समर्पयामि' नैवेद्याच्या—भोजनाच्या मध्यंतरांत पिण्याकरतां पाणी अर्पण करण्याची जी पद्धति आहे ती तर फारच महत्वाची व उद्बोधक आहे. धर्मशास्त्रकारांनीं आचार रूढ करतांना मानवी जीवनाच्या अंगप्रत्यंगाचा किती सूक्ष्म विचार केला होता हें त्या वरून स्पष्ट होतें.

आयुर्वेद प्रामुख्यानें भौतिकाचा—शरीराचा विचार करणारें शास्त्र आहे. त्या आयुर्वेदांतील अग्रगण्य 'सुश्रुत' ग्रंथांत—

प्रक्षाल्येदद्भिरास्यं भुंजानस्य मुहुर्मुहुः ।
विशुद्धरसने तस्मै रोचतेऽन्नमपूर्ववत् ॥

भोजन करतांना मध्यें मध्यें घोट घोट पाणी पिऊन मुख (अन्ननलिका) स्वच्छ करावें. विशेषतः जीभ स्वच्छ करावी. त्या मुळें अन्न तेंच-त्या प्रकारचेंच असलें तरी त्याची चव नवीनच वाटते. (संपूर्ण जेवण चवीनें जाण्याकरतां मध्यें मध्यें घोट घोट पाणी पिऊन जीभ स्वच्छ करणें आवश्यक आहे) असें स्पष्टपणें प्रतिपादन केलें आहे त्यांतील मर्म असें आहे—

रसाचा-चवीचा बोध करून देणाऱ्या आपल्या जिभेवर खरखरीत-खडबडीत स्वरूपाचें एक सूक्ष्म मृदु आवरण आहे. त्यानेंच आपणाला अन्नाच्या चवींचा बोध होत असतो. अन्न गिळून टाकलें तरी त्या अन्नाचे चिकट व सूक्ष्म घटक जिभेच्या त्या खडबडीत आवरणावर अडकून चिकटून रहातात, आणि अशा तऱ्हेनें अन्नकणांची पुटें चढल्यामुळें मागाहून भक्षण केल्या जाणाऱ्या अन्नाचा स्पर्श त्या रसनाग्राहक सूक्ष्म पटलाशीं नीट होत नाहीं त्या मुळें प्रथम भक्षण केलेल्या अन्नाइतकी चव नव्या अन्नाची कळत नाहीं. म्हणून मधें मधें घोट घोट पाणी पीत राहिल्यानें जिव्हा व जिव्हेवरचें तें रसनाग्राहकपटल स्वच्छ रहातें व शेवटपर्यंत अन्न चवीनें जेवतां येतें. विशेषतः एका रसाचें भक्षण केल्यावर घोट भरपाणी पिऊन मग वेगळ्या रसाचें अन्न भक्षण केलें तर त्याची खरीखुरी चव उत्कृष्टपणें समजते व भक्षणाचा आनंद मिळतो. म्हणून जेवणांत मधें मधें थोडें थोडें पाणी पिणें आवश्यक आहे. 'भोजने चामृतं वारि' भोजनांत मधें मधें पाणी पिणें हें भोजनाला अमृताची चव प्राप्त करून देतें असें वृद्धचाणक्यानें म्हटलें आहे. त्याच प्रमाणें क्षेमकुतूहल नांवाच्या सुभाषित संग्रहांत—'तस्मान्नरो वन्हिविवर्धनाय। मुहुर्मुहुर्वारि पिबेदभूरि॥' जठराग्नि प्रज्वलित होऊन अन्नपचन योग्य तऱ्हेनें होण्याकरतां जेवणांत पुनः पुनः पण थोडें थोडें पाणी अवश्य प्यावें असें सांगितलें आहे.

अशा तऱ्हेनें जीवनांत अपरिहार्य असलेल्या भोजनांत अत्यावश्यक व हितकारक असलेलें मधें मधें पाणी पिणें धर्मशास्त्रकारांनीं देवाला नैवेद्य समर्पण करण्याच्या आचारांत रूढ करून ठेविले आहे.

आपण हा आशय लक्षांत न घेतां गतानु-

गतिक होऊन 'नैवेद्यमध्ये पानीयं समर्पयामि' असें म्हणून पळीभर पाणी ताम्हनांत सोडतो आणि मोकळे होतो. वस्तुतः आपले आचार अत्यंत अर्थपूर्ण आहेत. त्यांचा विचार करून ते आचरणांत आणले पाहिजेत.

आपल्या धार्मिक आचारांत देव आणि आपण एक होतो व शेवटी पुन्हा एक व्हायचें आहे. हे प्रमुख सूत्र आहे. म्हणून देवाला जें जें अर्पण करावयाचें तें तें वस्तुतः आपल्यालाच द्यावयाचे आहे या जाणिवेनें देवपूजा वगैरे धार्मिक विधि करायचे असतात. त्या दृष्टीनेच धार्मिक आचार रूढ केले आहेत. देवाला नैवेद्य दाखवितांना जसें 'मध्ये पानीयं' देतो तसेंच आपणही जेवतांना 'मध्ये पानीयं'—मधें मधें पाणी प्यालें पाहिजे हाच या आचाराचा अर्थ आहे.

नाही तरी 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म' भोजन यज्ञ आहे, अन्तरात्म्याला नैवेद्य समर्पण करणें आहे असे आपण मानतोंच ना!

अशा या आपल्या आचारांचा विचार करून आचरणांत आणण्याची सुबुद्धि परमेश्वरानें आम्हां सर्वांना द्यावी हीच प्रार्थना.

# काकदृष्टी नसावी....

या नाहीं त्या रूपानें संस्कृत व मराठी साहित्यांत कावळा प्रसिद्ध आहे. तो एक सर्वपरिचित पक्षी आहे. 'प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते' उत्तुंग राजवाड्याच्या शिखरावर बसला तरी कावळा हा कावळाच रहातो, तो गरुड होत नाहीं, रंगरूप सारखें असलें तरी कावळा कोकिळ होत नाहीं, तो कावळाच रहातो. अशा या आपल्या गुणधर्माशीं एकनिष्ठ रहाणाऱ्या कावळ्याची वृत्ति आणि दृष्टी ही अद्वितीय आहे. पदार्थांतले दोषच तेवढे पाहणारी, प्रत्येक वस्तुकडे तिरकसपणें पहाणारी त्याची दृष्टि सर्वप्रसिद्ध आहे.

कावळ्याच्या डोळ्यांची रचना इतरांपेक्षां निसर्गतःच वेगळी आहे. डोळे इतरांप्रमाणेंच दोन, पण 'बाहुली'-बुब्बुळ मात्र एकच. त्यामुळें त्या बाजूची वस्तु पहावयाची त्या बाजूकडे 'बाहुली' न्यावी लागते व त्या करतां मानही वाकडी करावी लागते, त्यामुळें त्याचें पहाणें 'तिरकस' आहे असें वाटतें. वस्तुतः त्याच्या नेत्रेंद्रियाची रचनाच तशी असल्यामुळें तो तशा पद्धतीनें पहात असतो. तो कांहीं मुद्दाम-हेतुपूर्वक वाकड्या नजरेनें पहात नसतो. खऱ्या अर्थानें त्याला एकच डोळा असल्यामुळें तसें पहावें लागतें.

काक निसर्गतःच 'एकाक्ष' आहे, पण मानव 'द्व्यक्ष' आहे. त्याला उत्कृष्ट दोन नेत्र लाभले आहेत, शिवाय प्रयत्नानें तिसरा 'ज्ञान नेत्र' प्राप्त करून घेण्याची क्षमता ही त्याच्या ठिकाणीं निसर्गानें निर्माण करून ठेविली आहे. या प्रयत्नसाध्य तृतीय नेत्राची गोष्ट बाजूला ठेवली तरी निसर्गानें दिलेल्या दोन नेत्रांचा उपयोग प्रायः सामान्य मानव नीट करीत नाहीं. दोन डोळ्यांनीं सरळ पहाणें शक्य असून ही तो वाकडें पहातो, तिरकस पहातो. स्वतः शिवाय विश्वांतील यच्चयावत् वस्तूंतील दोषच पहात असतो. यालाच 'दोषैकदृष्टि' म्हणतात.

तात्विकदृष्ट्या गुण—दोष, बरेपणा—वाईटपणा, सगुणता—निर्गुणता इत्यादि गुण हे सापेक्ष व व्यक्तिनिरूपित आहेत, मुळात नाहींत, हें खरें असलें तरी त्यांना व्यावहारिक अस्तित्व आहेच, म्हणून गुणांना गुण म्हणणें, दोषांना दोष मानणें हें सरळ आहे.

दुसऱ्यांच्या दोषांनाही गुण मानणाऱ्या संत सज्जनांची गोष्ट वेगळी, पण आपण सर्व-सामान्य माणसांनीं दुसऱ्यांच्या गुणांना गुण म्हणण्याची, दोषांनाच दोष मानण्याची व त्या दृष्टीनेंच त्यांच्याकडे पहाण्याची दृष्टि ठेविली पाहिजे. पण...

आपण लोकांच्या गुणांनाही दोष मानीत असतो. महाकवि भवभूतीनें 'यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः' स्त्रिया, आणि वाणी यांच्या साधुत्वाबद्दल—चांगले-पणाबद्दल लोक नेहमीं दुर्जनांच्या दृष्टीनेंच पहात असतात, असें म्हटलें आहे. सामान्यजन, स्त्रिया आणि दुसऱ्यांच्या गुणां विषयीं 'दुर्जन'च बनतात हें खरें आहे. पण तें चांगलें नाहीं.

माणसानें सरळ पहावें, चांगल्याला चांगलें म्हणावें, वईटाला वाईट म्हणावें. सज्जन होतां येत नसेल तर सामान्य माणूस रहावें. सदैव वाईटाकडे, दोषांकडे पाहाण्याची, लोकांचे दोषच पहाण्याची 'काकदृष्टि' दोषैक-दृष्टि बाळगून 'दुर्जन' बनूं नये.

'हंस' होतां येत नसेल तर निदान 'काक' बनूं नका, माणूस रहा, सामान्य माणूसच रहा!

## हव्यास....

माणसानें फार हव्यास करूं नये असें आपण म्हणत असतो. 'हव्यास धरणें', किंवा 'हव्यास करणें' या वाक्प्रचारांतील हव्यास शब्दांत इच्छा, लोभ, महत्वाकांक्षा, शोक यांच्या आधिक्याचा, 'फाजिलपणाचा', अवास्तवतेचा अन्तर्भाव आहे. (फाजिलपणा म्हणजे चावटपणा अश्लीलता नव्हे)

येथें एक गोष्ट लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. हव्यास शब्दाचा प्रयोग चांगल्या गोष्टींच्या संदर्भांतच केला जातो. अत्तरांचा किंवा फुलांचा हव्यास असें म्हटलें जातें. दारू पिण्याचा, चोरी करण्याचा हव्यास असें म्हणत नाहींत.

पण हव्यास जर फारच किंवा 'फाजील' झाला तर 'व्यसनांत' परिणत होतो हेंही खरेंच.

'अतिसर्वत्र वर्जयेत्', 'अति तेथें माती' ही वस्तुस्थिति आहे.

हा हव्यास शब्द संस्कृत 'हव्याश' शब्दापासून आला आहे. 'हव्यं अश्नाति' इति हव्याशः. हविर्द्रव्यें भक्षण करतो तो हव्याश म्हणजे 'अग्नि'.

विषयांच्या उपभोगानें विषयांची वासना शांत होत नाहीं. जसजशीं हविर्द्रव्यें (तिळ, तांदुळ, तूप, समिधा वगैरे) अर्पण करीत रहाल तसतसा अग्नि वाढतच जातो. तशा उपभोगानें वासना वाढतच जातात.

कोणताही हव्यास वासनामूलकच असतो. हव्यास म्हणजे हव्याश म्हणजेच अग्नि. हव्यासानें हव्यास वाढतच जातो म्हणून फाजील हव्यास करणें चांगलें नाहीं. अति हव्यास हें दुःखाचें मूळ आहे. व्यास म्हणतात—

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥

सद्धर्म प्रकाशन, पातंजल योगसूत्र.
सुलभ मराठी भाषान्तरासह. किंमत
पोस्टेजसह २० रुपये मात्र.

गिरगावांत देणगी हातीं देण्याचा पत्ता :
**श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**
कापडाचे व्यापारी
१४८ प्रार्थनासमाज, गिरगांव, मुंबई ४

# सेवेसीं श्रुत होय....

श्रीः

सप्रेम नमस्कार

सद्धर्माचा तेविसाव्या वर्षाचा हा दुसरा अंक आमच्या मुद्रानकांच्या हातीं देतांना आम्हाला आनंद वाटत आहे. मागील अंक आवडल्याबद्दल अनेक वाचकांचीं पत्रें आलीं, आनंद झाला. आम्ही त्यांचे आभारी आहोत. हा ही अंक वाचकांना आवडेल अशी अपेक्षा आहे.

अगदी अपरिहार्य म्हणून अगतिकतेनें सद्धर्माच्या वार्षिक देणगीत-वर्गणीत वाढ केल्याचें निवेदन मागील अंकांत केलें होतें. तदनुसार पुष्कळ वाचकांनीं वार्षिक देणगी म्हणून पांच रुपये पाठविले. त्यांचे आम्ही आभारी आहोत.

देणगीत वाढ केल्याच्या निवेदनाकडे कांहींचें लक्ष न गेल्यामुळें त्यांनीं पूर्वीप्रमाणेंच देणगी पाठविली आहे. त्यांनीं १९८८ पासूनची वर्गणी कृपया पांच रुपयांच्या हिशोबानें पाठवावी अशी नम्र विनंति आहे.

ज्या आमच्या वाचकांनीं १९८७ किंवा त्याच्या पूर्वी तीन वा अधिक वर्षांची वर्गणी प्रतिवर्षी दोन रुपयांच्या हिशोबानें पाठविली आहे, त्यांना त्यांची मुदत संपेपर्यंत सद्धर्माचा अंक जात राहील. आम्ही आमचें काम निष्ठेनें करीत आहोत. आमचे वाचक सुद्धां आमच्या कार्याची निष्ठेनें दखल घेतील असा विश्वास वाटतो.

योग्य ती सर्व काळजी घेतली असतां ही कांहीं अंक योग्य तें 'पोस्टेज' लावलें असतांही 'नॉटपेड' म्हणून आमचेकडे परत आले. आमच्या प्रमाणेंच कांहीं ग्राहकांना निष्कारण नॉटपेडचा भुर्दंड पडला असेल, त्यांनीं तो भद्रपणानें स्वीकारला असेल याची जाणीव आम्हांला आहे.

अगतिकता, कमालीची अस्थिरता आणि त्यांच्या जोडीला 'अविश्वस्तता' यांचें आज साम्राज्य आहे. शासनाच्या सर्वंकषतेचा अभाव व स्वयंशासनाचा सार्वत्रिक अभाव यांमुळें मावळेल्या गोंधळाच्या परिस्थितींत सुद्धां, कठिण असलें तरी जगणें आहे, सत्कार्य करीत रहाणें आवश्यक आहे. या जाणिवेनें आम्ही अल्पसें विचार प्रवर्तनाचें कार्य करीत आहोत. त्यांत वाचकांचें सहकार्य आम्हाला लाभावें अशी इच्छा आहे.

त्याच बरोबर एक नम्र विनंति आहे कीं देणगी-वर्गणी संपली आहे, कृपया पाठवावी इत्यादि निवेदन करणें आमच्या अल्पशा साधनसामग्रीच्यामुळें व वेळेच्या अभावीं अशक्य आहे, म्हणून कृपया ग्राहकांनीं आपण होऊन स्मरणपूर्वक वर्गणी पाठवावी. अधिक काय लिहिणें! सद्धर्मावर लोभ असों द्यावा ही प्रार्थना......

संपादक : हरि जनार्दन दामले

प्रकाशक व मुद्रक : अनंत विनायक घोरे, ९ कृष्णा सांघी पथ, मुंबई ४०० ००७

मुद्रण स्थळ : मौज प्रिंटिंग ब्यूरो, गिरगांव, मुंबई ४०० ००४